# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक एसईसी/पीएम्-१४९६/सीआर-११/का-३,
नवीन प्रशासकीय भवन, पहिला मजला,
मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक १५ मार्च, १९९६.

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)
आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई व बृहन्मुंबई वगळून)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

**विषय :--पंचायत व नगरपालिका निवडणुका--**
राज्य निवडणूक आयोगाचे पितळी मुद्रा (सील) वापरणेबाबत
तसेच इतर निवडणूक साहित्य खरेदीबाबत ......

भारताच्या संविधानामधील अनुच्छेद २४३ के व २४३ झेड्-ए नुसार राज्य निवडणूक आयुक्तांकडे पंचायत (ग्रामपंचायत, पंचायत समित्या व जिल्हा परिषदा) आणि नगरपालिका (महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती) यांच्या निवडणूका घेण्याची जबाबदारी दिनांक २६ एप्रिल, १९९४ पासून सोपविण्यात आली आहे.

२. तत्पूर्वी महाराष्ट्र शासन या निवडणुका पार पाडीत असे व त्या निवडणुकांसाठी विधानसभा व लोकसभा यांच्या निवडणुकांसाठीचे साहित्य वापरण्यात येत असे. परंतु मागील दोन वर्षात भारत निर्वाचन आयोग निवडणूक साहित्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरण्याचे बाबतीत जी कार्यवाही अवलंबिण्याचा आग्रह वा हेका करीत आहे त्यामुळे स्थानिक संस्थांच्या निवडणुकांसाठी स्वतंत्ररीत्या निवडणूक साहित्य खरेदी करून संग्रह करणे आवश्यक झाले आहे.

३. त्यासाठी, विभागीय आयुक्तांनी त्यांच्या विभागातील पंचायतींच्या व नगरपालिकांच्या निवडणुका घेण्यासाठी एकाचवेळी निवडणूक घ्यावयाच्या एकूण प्रभागांच्या मतदान केंद्रांची संख्या विचारात घेऊन एकाचवेळी राखीव कोट्यासह किती पितळी मुद्रा (सीले) लागतील, याचा आढावा प्रथम घ्यावा.

४. राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या मुदती संपण्याचा कालावधी हा भिन्न आहे. तसेच भारतीय घटनेतील तरतुदीनुसार तो पाच वर्षाचा निश्चित आहे. त्यामुळे वेगवेगळ्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका वेगवेगळया वेळी होतील, याचाही विचार करून जिल्ह्यासाठी आवश्यक असलेल्या पितळी मुद्रा (सीले) खरेदी करण्याची संख्या विभागीय आयुक्तांनी निश्चित करावी. यासाठी जो खर्च यईल तो त्या महसूल विभागातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा व ग्रामीण क्षेत्र यांची लोकसंख्या विचारात घेऊन सर्वसाधारणपणे त्या प्रमाणात विभागण्यात यावा. महानगरपालिका व नगरपरिषदा यांच्याकडील खर्च संबंधित महानगरपालिका व नगरपरिषदांनी करावयाचा आहे व ग्रामपंचायतींचा व जिल्हा परिषदांचा खर्च जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडून ग्रामपंचायतींच्या व जिल्हा परिषदांच्या निवडणुकीच्या खर्चाचे तरतुदीमधून समप्रमाणात खर्च करावयाचा आहे.

५. नगरपालिका व पंचायती यांच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने स्वतंत्र पितळी मुद्रेचा (सील) नमुना मान्य केला असून, त्याचे २ नमुने खाली दर्शविल्याप्रमाणे आहेत. ही पितळी मुद्रा (सील) विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करण्याची कार्यवाही विभागीय पातळीवर करण्यात यावी. राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्रमांक एसईसी/जीईएन्/पीएम्/१४९६/सीआर्-१०/का-३, दिनांक २३ फेब्रुवारी १९९६ च्या पत्रात पितळी सीले पुरविणाऱ्या २ उत्पादकांची नावे नमूद करण्यात आलेली आहेत. विधानसभा व लोकसभा निवडणुकांसाठी केंद्र शासनाने ज्या कंपन्यांकडून पितळी मुद्रा (सीले) खरेदी केल्या आहेत, त्या कंपन्यांची नावे शासकीय लेखनसामुग्री मुद्रणालयाशी संपर्क साधून प्राप्त करून घ्यावीत व त्यांनाही निविदा नोटीशीच्या प्रती पाठविण्यात याव्यात.

६. पितळी मुद्रा (सीले) खरेदी केल्यानंतर जिल्ह्यासाठ, निश्चित केलेल्या संख्येएवढ्या पितळी मुद्रा (सीले) जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली व अभिरक्षेखाली ठेवण्यासाठी देण्यात याव्यात. याप्रमाणे योग्य ती कार्यवाही विभागीय पातळीवर आयुक्त यांनी करावी.

७. वरीलप्रमाणे कार्यवाही करुन इतर आवश्यक असलेले निवडणूक साहित्य खरेदी करण्याची तजवीज करावी.

८. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीच्या संदर्भात परिपत्रक क्रमांक ग्रापनि-१०९१/प्र. क्र. १७१६/२१अ, दिनांक १८ फेब्रुवारी, १९९२ मधील परिच्छेद-८ मधील मतदानाचे इतर साहित्य खरेदी करण्याबाबत दिलेल्या सूचनांनुसार मतदान साहित्य खरेदी करण्यात यावे.

(दे. ना. चौधरी)
राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र.

प्रत माहितीसाठी अग्रेषित–
(१) सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
(२) सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
(३) निवड नस्ती.

पितळी मुद्रेचा मान्य नमुना

